Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.lbp.world

# वर्धा जिल्हयातील सोयाबीन उत्पादकांद्वारे शेती विषयक सल्ला घेण्यासंबंधीचे अध्ययन

प्रा. भास्कर जे. वाळके
लोक महाविद्यालय, जि. वर्धा

## सारांश

भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही कृषीला महत्व आहे. आजही पाहिजे त्या प्रमाणात कृषीक्षेत्राचा विकास झालेला नाही. त्याला अनेक नैसर्गिक आर्थिक व सामाजिक घटक कारणीभूत आहेत. परंतू या समस्या समजून घेऊन त्यावर काही उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी कृषी समस्या सोडविण्यासाठी काही उपयोजना सुचविण्यासाठी शासनद्वारे कृषी सल्ला केंद्राची सुरूवात केलेला आहे. त्या अतंर्गत वर्धा जिल्हयातील बहुतांश सोयाबीन उत्पादक शेतीविषयक सल्ला घेतात किंवा नाही व घेत असल्यास सल्लयांच्या स्त्रोतांसंबंधीचे अध्ययन करण्या करीता संशोधनकर्त्याने प्रस्तुत विषय निवडला आहे.

## प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देशअसून भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा व्यवसाय शेती आहे. भारतातील भूमीउपयोजनात असे दर्शविले आहे की एकूण क्षेत्रफळाच्या 47% क्षेत्र हे शेतीखाली आहे. देशातील एकूण लोकसंख्येच्या 70% लोक हे शेतीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अवलंबून आहेत. भारतातील शेती ही मोसमी हवामानार अवंलबून आहे. सेयाबीनरतात पावसाळयात पाऊस पडतो मात्र हा पाऊस सर्व भारतभर समान प्रमाणात पडत नाही काही भागात अतिपर्जन्य होते तर काही भागात अत्यल्प पर्जन्य होते. म्हणजेच मोसमी पर्जन्य हे अतिरिक्त व विषम असल्याने भारताच्या शेतीवर याचा फार मोठा परिणाम होतो. भारतामध्ये शेती हा प्राथमिक व महत्वाचा व्यवसाय आहे. भारत हा दाट लोकसंख्येचा देश आहे. मागील तीन ते चार दशकामध्ये भारतामध्ये शेती व्यवसायात अमुलाग्र बदल झालेले दिसून येतो. आधुनिक पद्धतीची जलसिंचन पद्धती, कृषीतंत्रज्ञानात झालेले बदलाचा अवलंब व पिक पद्धतीतील बदल यामुळे शेतीला चांगले दिवस येत आहे. 1967–68 या वर्षी भारत सरकारने हरितकांती योजना सुरू केली व याचा परिणाम म्हणून अनेक पिकांच्या दरहेक्टरी उत्पादनात वाढझाली. शिवाय भारतात काही पिक विमा योजना

सुरू करण्यात आल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान भरून मिळण्याची हमी शेतक—यास मिळू लागली.

भारतातील महाराष्ट्र हे राज्यही कृषीप्रधान राज्य आहे. एखाद्या राज्यातील शेतीचा अभ्यास करतांना तेथील शेतीचे महत्व, कृषी भूमीउपयोजना, शेतीची पद्धत, पिके, शेतीचा विकास आणि त्या भागातील शेतीच्या समस्या या गोष्टीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. महाराष्ट्रामध्ये शेतील अद्यापही अनन्यसाधारण महत्व आहे. महाराष्ट्रातील 57.6% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते यापैकी जवळ—जवळ 90: लोक हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहेत. जमीन ही मानवास निसर्गाकडून मिळालेली महत्वाची साधनसंपत्ती आहे. या साधनसंपत्तीच्या आधारेच मानव आपल्या गरजा पूर्ण करीत असतो. या जमिनीच्या योग्य वापरावरच मानवाचा विकास अवलंबून असतो. कोणत्याही प्रदेशातील जमिनीचा वेगवेगळया हेतूने केला जाणारा वापर म्हणजेच भूमिउपयोजन होय. महाराष्ट्रामध्ये मात्र दिवसेंदिवस शेती व्यवसायातील लोंकाचे प्रमाण कमी होत आहे.

वर्धा जिल्हयातील पिकाचे स्वरुप

वर्धा जिल्हयातसेयाबीनाचे मुख्य पिक आहे. वर्धा जिल्हयामध्ये 2010—2011 या व निव्वळ पिकाखालील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या 66.68 टक्के होते. या शिवाय तृणधान्या करिता 4. 05 टक्के, कडधान्याखालील 15.62 टक्के, खाद्य पिकाखालील 94.08 टक्के व उर्वरित 5.92 टक्के अखाद्य पिकाखालील होते.

वर्धा जिल्हयातील कृषी समस्या

1)पावसाची समस्या — महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात पडणारा पाऊस हा मोसमी वा—यापासून पडतो. महाराष्ट्रात पावसाळा ऋतू चार महिन्याचा असून या चार महिन्यांत काही दिवसच पाऊस पडतो. पडणारा पाऊस हा अनियमित, अनिश्चित व विषम स्वरूपात असतो. काही भागात एकाच वेळी खूप पाऊस पडून जातो व नंतर चार महिने पाऊस पडतच नाही. नैऋृत्य मोसमी वा—यापासून पडणारा पाऊस हा कोकण विभाग व सहयाद्री डोंगररांगा या भागातच मोठया प्रमाणात पडतो. मात्र या भागात शेतीयोग्य जमिन कमी आहे.

2) जमिन धूपेची समस्या :— वारा, पाऊस, पुर यासारख्या घटकांमुळे जमिनीवरील सुपिक मातीचा थर निघून जाणे म्हणजे जमिनीची धूप होणे होय. महाराष्ट्रातील काही भागात खूप पाऊस पडतो या पडणा—या पावसामुळे सुपीक मृदा पाण्यासोबत वाहून जाते व काही भागात खडकाळ भाग उघडा पडतो. नद्यांना येणा—या पुरामुळे नदीच्या पात्राच्या बाहेर पाणी घुसून आसपासचा प्रदेशाची मोठया प्रमाणात धूप होते.

3) जमिनीचे क्षारीकरण :— सागर किणारी भागात भरती आहोटीमुळे सागराचे पाणी वारंवार येऊन या भागातील जमीन क्षारयुक्त होत आहे.पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊसासारखे खूप पाणी आवश्यक असणारे पीक वारंवार घेतले जाते आहे. कृत्रिम जलसिंचनामुळे या भागातील जमिन क्षारयुक्त व आम्लधर्मी बनत आहे. शेतीला खूप पाणी दिले तर अधिक उत्पादन होते अशी भाबडी मानसिकता शेतक—याची असते यामुळे जमिनीचे क्षारीकरण वाढत आहे. साहजिकचा क्षारयुक्त जमीन नापिक होते.

4) नैसर्गिक आपत्ती :— महाराष्ट्रामध्ये कधी धुके, गारा किंवा वादळे यासारखे नैसर्गिक आपत्ती येत असतात. पावसाळयात किंवा हिवाळयात काही भागात धुके पडून पिके पिकाची मोठया प्रमाणात हानी होते पिके करपून जातात. गारामुळे उभे असलेले पिके आडवी होतात. आंबा, मोसंबी, द्राक्षे याचे यामुळे मोठया प्रमाणात नुकसान होते. तर वादळामुळे ऊस, सेयाबीन, आंबा यासारखे पिके धोक्यात येतात.

5) पिकांवरील रोग :– वातावरणात बदल झाला की महाराष्ट्रातील पिकावर मोठया प्रमाणावर रोग पडतात. महाराष्ट्रात काही भागात पावसाळया नेहमी आकाश ढगाळलेले असते अशा वेळी रोगीट वातावरण निर्माण होऊन त्या भागातील पिकावर मोठया प्रमाणावर किड व आळी पडते हे किडे व आळया पिकांचा नायनाट करून टाकतात.

6) जलसिंचनाची सुविधा :– शेतीचा खरा विकास साधावयाचा असेल तर शेती ही बागायती पाहिजे. बागायाती शेतीसाठी जलसिंचनाची शाश्वत सुविधा आवश्यक आहे. महाराष्ट्रात नेमके हीच सुविधा कमी असल्याने राज्यातील शेतीखाली असलेल्या एकूण क्षेत्रापैकी 16.4 टक्के क्षेत्र हे जलसिंचनाखाली आहे

7) पारंपारीक शेती पद्धती :– महाराष्ट्रात फार प्राचिन काळापासून शेती केली जाते. परंतु ही शेती आधुनिक काळातही त्याच पद्धतीने केली जात आहे. जमिनीची मशागत, पेरणी, जलसिंचनाच्या पद्धतीत पाहिजे त्या प्रमाणात बदल झालेला दिसत नाही. आज शेतीसाठी नवनविन यंत्रे उपलब्ध झालेली आहेत. मात्र आपण जुनच अवजारे वापरात आहोत.

8) शेतक–यांचे दारिद्रय :– महाराष्ट्रातील शेतकरी दिवसेंदिवस गरीब गरीबच होत चालला आहे. हंगामी व लहरी स्वरूपात पडणारा पाऊसात शेतकरी कसेबसे शेती करता त्यामध्ये कधी–कधी नैसर्गिक आपत्ती येऊन येणारे पीक उद्‌वस्त होते व शेतक–यांच्या हातातोंडाशी आलेले पीक जाते. अशा परिस्थितीत बरेचसे शेतकरी सावकाराकडून कर्ज काढतात. शेतीवर कर्ज फेडू शकत नाही व कर्जबाजारी होतात. त्यामुळे शेतीसाठी लागणारे चांगले बियाने, यंत्रे, खते खरेदी करतात येत नाही. परिणामी शेती चांगल्या पद्धतीने पिकत नाही. व दारिद्रयात वाढत होत जाते.

9) खतांचा वापर :– महाराष्ट्रामध्ये दिवसेंदिवस शेतीचा कस कमी होत आहे. शेतीतून अधिक उत्पादन घेण्यासाठी तिचा कस टिकविणे आवश्यक आहे. कृत्रिमरित्या हा कस टिकविण्यासाठी रासायनिक खताचा वापर केला जातो. महाराष्ट्रात खताचा वापर होत आहे मात्र त्याचा वापराचे प्रमाण फार कमी आहे. त्यामुळे शेतक–याला पाहिजे त्या प्रमाणात शेती उत्पादन देत नाही.

10) पारंपारिक बियाणांचा वापर :– शुद्ध बिजापोटी फळ रसाळ गोमटी या म्हणीप्रमाणे जर बिज चांगले असेल तर फळे निश्चितच चांगले मिळते. परंतु महाराष्ट्रामध्ये आजही परंपरागत जून्या पद्धतीचे बियाणे वापरली जातात. गावातील खाजगी दुकानात सहसा हलक्या प्रतिचे बियाने असतात. व शेतकरी याच दुकानातून बियाणे विकत घेतात कारण हे बियाने उधार मिळते. परिणामी या हलक्या दर्जाच्या बियानापासून उत्पादन कमी मिळते.

11) वाहतूकीची सोयः– विकसीत महाराष्ट्रामध्ये आजही अनेक भागामध्ये खेडयापर्यंत वाहतूकीच्या सोयी पाहिजे त्या प्रमाणात झालेली नाही. शहरांना जोडणारे रस्ते चांगले असून ग्रामीण भागातील रस्ते खराब व कच्चे आहेत. साहजिकच ग्रामिन भागातील शेतक–यांचा शेतमाल शहरापर्यंत वेळेत आणण्यासाठी अडचणी निर्माण होतात.

12) बाजारपेठेची उपलब्धता :– महाराष्ट्रात शेती ही ग्रामिण भागात केली जाते. या शेतीतील उत्पादीत माल शहरापर्यंत पोहचविण्यास या मालास चांगला भाव मिळून शेतक–यांना अधिक नफा होतो. मात्र महाराष्ट्रातील मोठे शहरे व बाजारपेठा खेडयापासून दूर असून त्यांना जोडणारे रस्ते चांगले नसल्याने शेतक–यांचा माला वाहतूकीत अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत शेतकरी आपला माल स्वतः बाजारपेठेत न विकता स्थानिक व्यापा–यांना व स्थानिक छोटया शहरामध्ये कमी भावात विकावा लागतो.

वरील समस्या समजून घेऊन त्यावर काही उपाययोजना शासनद्वारे कृषी सल्ला केंद्राची सुरूवात केलेला आहे. त्या अतंर्गत वर्धा जिल्हयातील बहुतांश सेयाबीन उत्पादक शेतीविषयक सल्ला घेतात किंवा नाही व घेत असल्यास सल्लयांच्या स्त्रोतांसंबंधीचे अध्ययन करण्या करीता संशोधनकर्त्याला खालील माहिति प्राप्त झाली.

सारणी क. 1 सेयाबीनउत्पादक शेतीविषयक सल्ला घेतात किंवा नाही हे विचारले असता खालील माहिती प्राप्त झाली.

| शेती विषयक सल्ला | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| उत्तरदाते | 75 | 175 | 250 |
| प्रतिशत प्रमाण | 30.00% | 70.00% | 100% |

आधार :– प्रश्नावलीचे वर्गीकरण

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, 250 उत्तरदात्यांपैकी 209 (30.00%) उत्तरदाते शेती विषयक सल्ला घेत असून, 157(70.00%) उत्तरदाते शेती विषयक सल्ला घेत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

यावरुन स्पष्ट होते की, वर्धा जिल्ह्यातील बहुतांश सोयाबीनउत्पादक शेतीविषयक सल्ला घेत नाही.

सारणी क. 2 सोयाबीनउत्पादक शेतकऱ्यांद्वारे शेतीकरीता घेण्यात येणाऱ्या सल्लयांच्या स्त्रोतांसंबंधी माहिती संकलीत केली असता खालील माहिती प्राप्त झाली.

| सल्लल्याचे स्त्रोत | दुरदर्शन | आकाशवाणी | मसिके | योजना | भेट | एस.एम. एस. |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | 68 | 31 | 60 | 47 | 73 | 31 |
| प्रतिशत प्रमाण | 90.4% | 41.1% | 74.6% | 63.2% | 97.6% | 41.1% |
| एकूण | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 |

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, केवळ 75सोयाबीन उत्पादकच शेतीविषयक सल्ला घेतात शेतीविषयक सल्ल्याकरीता ते एकापेक्षा अधिक स्त्रोतांचा वापर करीत असल्याचे आढळले. त्यापैकी 68 (90.4%) उत्तरदाते दुरदर्शनद्वारे शेतीविषयक माहिती घेत असून 31 (41. 1%) उत्तरदाते आकाशवाणीच्या माध्यमाने शेतीविषयक सल्ला घेतात. त्याचप्रमाणे मासिकांद्वारे शेतीविषयक सल्ला घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 60 (74.6%) आहे. विविध योजनांद्वारे माहिती प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 47 (63.2%) आहे. तसेच शासकीय कृषी अधिकारी व समन्वयकांच्या भेटी व एस. एम. एस. या स्त्रोतां कडून शेतीविषयक सल्ला घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अनुक्रमे 73 (97.6%) व 31 (41.1%) आहे.

यावरून स्पष्ट होते की, सोयाबीन उत्पादक शेतकरी विविध स्त्रोतांकडून शेती विषयक सल्ला घेत असून बहुसंख्य सोयाबीन उत्पादक शासकीय कृषी अधिकारी व समन्वयकांच्या भेटी व दुरदर्शन या स्त्रोतांकडून शेतीविषयक सल्ला घेतात.

निष्कर्ष

वर्धा जिल्हयातीलबहुतांश सोयाबीन उत्पादक शेतीविषयक सल्ला घेत नाही. तथापी शेतीविषयक सल्ला घेणारे सोयाबीन उत्पादक शेतकरी विविध स्त्रोतांकडून शेती विषयक सल्ला

घेत असून बहुसंख्य सोयाबीन उत्पादक शासकीय कृषी अधिकारी व समन्वयकांच्या भेटी व दुरदर्शन या स्त्रोतांकडून शेतीविषयक सल्ला घेतात.

संदर्भ ग्रंथसुची


1. डॉ. आगलावे प्रदिप– संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
2. डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, 2007, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
3. डॉ. भांडारकर– रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
4. डॉ. कविमंडन विजय– कृषी अर्थशास्त्र
5. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक– सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन 2013
6. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन–वर्धा जिल्हा
7. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, वर्धा जिल्हा
8. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख वर्धा जिल्हा
9. जिल्हा ॠतु व पिके अहवाल–वार्षिक अहवाल 2002ते 2011
10. पशुगणना–2001 आणि 2011
11. प्रत्यक्ष शेतक–याची मुलाखत, निरीक्षण व चर्चा